वृत्तपत्रांना वितरित करण्यात येत असलेल्या
दर्शनी व वर्गीकृत जाहिरातींबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्र. जाहिरात-२०१०//प्र.क्र.५/३४
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक २५ एप्रिल २०११

वाचा : १)सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक- पीयुबी-१०००/प्र.क्र.७३/२०००/३४,
दिनांक १ मे ,२००१

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक- जाहिरात-२००९/प्र.क्र.१३७/का-३४
दिनांक ३१/८/२००९.

परिपत्रक

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भिय शासन निर्णयातील नियम ६ अन्वये शासनाची विविध मंडळे, महामंडळे, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, शासन पुरस्कृत सहकारी संस्था आदी स्वायत्त संस्थाच्या वर्गीकृत जाहिराती तसेच दर्शनी जाहिरात शासन धोरणाप्रमाणे वृत्तपत्रांना परस्पर वितरित करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. अशा जाहिरातींच्या वितरणासाठी शासनमान्य वृत्तपत्रांच्या यादीचा तसेच शासनमान्य दराचा अंगीकार करुन शासन धोरणाप्रमाणे त्या त्या वर्गातील वृत्तपत्रांमध्ये करावयाच्या समान तत्वावरील वाटपाच्या धोरणाचा कटाक्षाने अंमल करावा अशी तरतूद नियमात करण्यात आली आहे. या नियमाची अंमलबजावणी होत नसल्याच्या तक्रारी वृत्तपत्र संघटना शासनाकडे करीत आहेत. तरी या शासन निर्णयातील नियम ६ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

तसेच संदर्भिय शासन निर्णयानुसार शासनाच्या विविध विभागांच्या सर्व वर्गीकृत जाहिरातींचे वितरण माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे मुख्यालय, विभागीय माहिती उपसंचालक तसेच संबंधित जिल्हा माहिती अधिका-यांमार्फत फक्त शासनमान्य यादीवरील वृत्तपत्रांनाच करण्यात येईल

उक्त नियमाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. त्यानुसार कार्यवाही न करणा-यां संबंधित दोषी अधिका-यांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.अशा आशयाच्या सूचना सर्व प्रशासकीय विभागानी त्यांच्या अधिनस्त मंडळे, महामंडळे, इतर स्थानिक स्वराज्य संस्था यांना देण्यात याव्यात अशी विनंती आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( कुं.नं.घाटगे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी.

प्रत माहितीसाठी
१) मा. राज्यमंत्री (माहिती व जनसंपर्क) मंत्रालय, मुंबई.
२)सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
३)सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी , सर्व जिल्हा परिषद
४)आयुक्त , सर्व महानगर पालिका,
५)महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय, मुंबई,
६)मुख्य अधिकारी , सर्व नगर पालिका,
७) सर्व महामंडळे/ मंडळे
८) सर्व संचालक/उपसंचालक/ जिल्हा माहिती अधिकारी.
९)निवडनस्ती (कार्यासन-३४)

ROTA-H 770 (25-5-2011).